# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेस ३० पर्यंत मुदतवाढ

## 'यूजीसी'कडून पब्लिक नोटीस जारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पब्लिक नोटीस जारी केली आहे.

दूरशिक्षण केंद्रातर्फे बी.ए., बी.कॉम., एम.ए. (भाषा), एम.ए. (सामाजिक शास्त्रे), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया जून ते ऑगस्ट दरम्यान राबविण्यात आली. परंतु विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ मिळावी यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा केला होता. त्याअनुषंगाने 'यूजीसी'ने ११ सप्टेंबर रोजी पब्लिक नोटीस प्रसिद्ध करून प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचेउ उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची मुदत नियमित शुल्कासह दि. ३० पर्यंत आहे. जे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत, त्यांनी या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2019
तरुण भारत

# दूरशिक्षणच्या प्रवेशप्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे बी.ए., बी.कॉम., एमए. (भाषा), एमए. (सामाजिक शास्त्रे), एम.कॉम., एम. एस्सी. (गणित) व पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया जून ते ऑगस्टदरम्यान झाली होती. महापुरामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता आला नाही. त्यामुळे या प्रवेशप्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यावरून युजीसीने ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर नियमित शुल्कासह ३० सप्टेंबरपर्यंत जमा करावी. विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी केले आहे.

लोकमत

# विवेकानंद महाविद्यालयासह डीआरके कॉमर्स कॉलेजचे वर्चस्व

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : विजेत्यांची 'मध्यवर्ती'साठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर/जयसिंगपूर** : शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव जयसिंगपूरमधील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये पार पडला. त्यातील कलाप्रकारांमध्ये विवेकानंद महाविद्यालय, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कॉलेजच्या (डीआरके कॉमर्स) विद्यार्थी कलाकारांनी वर्चस्व राखले. महोत्सवाचे संयोजक मगदूम कॉलेज व विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाने गुरुवारी निकाल जाहीर केला.

विविध १४ प्रकारांतील स्पर्धा या महोत्सवात घेतल्या. त्यातील कलाप्रकारनिहाय विजेत्यांची नावे (अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय अशी) **वक्तृत्व मराठी** : न्यू कॉलेज, राजाराम महाविद्यालय, श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. **हिंदी** : डी. आर. माने महाविद्यालय कागल, शिवाजी विद्यापीठ सर्व अधिविभाग, महावीर महाविद्यालय. **इंग्रजी** :



शिवाजी विद्यापीठ सर्व अधिविभाग, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, डीआरके कॉमर्स कॉलेज. **वादविवाद** : दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद महाविद्यालय, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज. **सुगमगायन** : विवेकानंद महाविद्यालय, शिवशाहू महाविद्यालय सरुड, व्यंकटेश महाविद्यालय. **लोकवाद्यवृंद** : विवेकानंद महाविद्यालय, डी. आर. माने महाविद्यालय, डीआरके कॉमर्स कॉलेज. **समूहगीत भारतीय** : विवेकानंद महाविद्यालय, राजाराम महाविद्यालय, न्यू कॉलेज. **लोककला** : दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, महावीर महाविद्यालय, न्यू कॉलेज. **लोकनृत्य** : आजरा महाविद्यालय, शिवशाहू महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय. **मूकनाट्य** : विवेकानंद महाविद्यालय, डीआरके कॉमर्स कॉलेज, दूधसाखर महाविद्यालय. **लघुनाटिका** : विवेकानंद महाविद्यालय, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, डीआरके कॉमर्स कॉलेज. **पथनाट्य** : दूधसाखर महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यड्राव. **एकांकिका** : भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, डीआरके कॉमर्स कॉलेज, शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी. **नकला** : राजाराम महाविद्यालय, आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज कोवाड, शिवाजी विद्यापीठ सर्व अधिविभाग.

विजेत्या महाविद्यालयांची फलटण येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

लोकमत

# ‘प्रात्यक्षिक वनस्पतिशास्त्र’चे प्रकाशन

## शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात पुस्तकाचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या नवीन सीबीसीएस अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेल्या प्रात्यक्षिकांसंदर्भातील पुस्तक ‘ए हँडबुक ऑफ प्रॅक्टिकल बॉटनी (बी. एस्सी. भाग २)’ चे प्रकाशन शहाजी छत्रपती महाविद्यालयामध्ये विज्ञान शाखेच्या वनस्पतिशास्त्र विभागाद्वारे शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. वर्षा डी. जाधव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

पुस्तकाचे लेखन प्रा. डॉ. संजय एस. साठे, डॉ. पांडुरंग बी. काळे, डॉ. सागर ए. देशमुख, डॉ. मकरंद मो. ऐतवडे आणि डॉ. राजेंद्र ए. लवटे यांनी केले. याप्रसंगी डॉ. सागर देशमुख आणि डॉ. मकरंद ऐतवडे यांनी लेखकांची भूमिका मांडली व आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे पी. डी. निंबाळकर यांनी सूत्रसंचालन केले व डॉ. ए. स. नलवडे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे अधीक्षक एम. व्ही. भोसले, डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. डी. के. वळवी यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. तसेच विज्ञान शाखेचे प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2019
लोकसत्ता

# कोल्हापुरात आजपासून भूगोल परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र अधिविभागातर्फे 'भू-पर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकास' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या, शुक्रवारी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. रवींद्र जायभाय उपस्थित असतील, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी गुरुवारी दिली. पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळे वायू, ध्वनी, जल, मृदा आदींच्या प्रदूषणाच्या समस्या जागतिक समुदायाला भेडसावत आहेत. या समस्यांचे योग्य रितीने निरसन करण्यासाठी या परिषदेत विचारमंथन होणार आहे. परिषदेत जैवविविधता, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, जोखीम मूल्यांकन आणि व्यवस्थापन, हवामान बदल, ग्रामीण विकास, शाश्वत विकास, नैसर्गिक साधन संपत्ती व लोकसंख्या वाढ, सुदूर संवेदन व भौगोलिक माहिती प्रणाली आदी विषयांवरील ७० शोधनिबंधाचे सादरीकरण होणार आहे, असे समन्वयक प्राध्यापक डॉ. संभाजी शिंदे डॉ. मीना पोतदार यांनी सांगितले.

# परीक्षा अर्ज मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षेचे अर्ज भरण्याची मुदत वाढवण्यात आली असून ३० सप्टेंबरअखेर अर्ज भरण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑगस्टमध्ये कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात आलेल्या महापुरामुळे अनेक कॉलेजना फटका बसला. पूरपरिस्थितीमुळे कॉलेजचे कामकाज बंद राहिल्याने परीक्षा अर्जांसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यापीठाकडे जमा करण्याची मुदत एक ऑक्टोबरपर्यंत आहे.

# पुरुषोत्तम करंडक २२ सप्टेंबरपासून

कोल्हापूर : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभिनयकलेला व्यासपीठ देणाऱ्या पुरूषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेला २२ सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. विद्यापीठाच्या संगीत व नाट्शास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर व देवलक्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील व कलोपासक संस्थेचे अध्यक्ष काका निगोजकर यांच्या हस्ते २२ रोजी सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. पुणे येथील महाराष्ट्र कलोपासक व कोल्हापूर येथील गायन समाज देवल क्लब यांच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन केले असून यंदा स्पर्धेचे नववे वर्ष आहे. यंदा शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहात २४ सप्टेंबरपर्यंत ही स्पर्धा रंगणार आहे.

# युवा महोत्सवात शहरातील महाविद्यालयांची बाजी

## जिल्हास्तर निकाल जाहीर



शिवाजी विद्यापीठातून...

### विजेत्या संघांचा आता फलटण दौरा

जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील विजेत्या संघांनी मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत फलटणमधील मुधोजी महाविद्यालयात सादरीकरणासाठी उपस्थित राहणे गरजेचे आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात शहरातील महाविद्यालयांनी बाजी मारली आहे. विवेकानंद महाविद्यालय, न्यू कॉलेज, महावीर महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज, राजाराम महाविद्यालयाने यश संपादन केले.

विद्यापीठाचा ३९ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव १८ सप्टेंबर रोजी जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये झाला. युवा महोत्सवाचा १४ कलाप्रकारांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. वक्तृत्व मराठी- न्यू कॉलेज (प्रथम), राजाराम महाविद्यालय (व्दितीय), श्री. व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी (तृतीय). वक्तृत्व हिंदी- डी. आर. माने महाविद्यालय, कागल (प्रथम), सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ (द्वितीय), महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (तृतीय). वक्तृत्व इंग्रजी- सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ (प्रथम), डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज (द्वितीय), कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर (तृतीय).

वादविवाद- दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (प्रथम), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (व्दितीय), डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर (तृतीय). सुगम गायन- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड (द्वितीय), श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (तृतीय). लोकवाद्यवृंद- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), डी. आर. माने महाविद्यालय, कागल (द्वितीय), कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर (तृतीय). समुहगीत भारतीय- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर (द्वितीय), न्यू कॉलेज, कोल्हापूर (तृतीय).

लोककला- दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी (प्रथम), महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (द्वितीय), न्यू कॉलेज, कोल्हापूर (तृतीय). लोकनृत्य-आजरा महाविद्यालय, आजरा (प्रथम), श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड (द्वितीय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (तृतीय). मूकनाट्य- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (तृतीय). लघुनाटिका- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (द्वितीय), कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर (तृतीय). पथनाट्य- दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (प्रथम), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (तृतीय). एकांकिका- भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (प्रथम), कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (तृतीय). नकला- राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर (प्रथम), आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज, कोवाड (द्वितीय), सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ (तृतीय).



# प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांची निवड



कोल्हापूर (प्रतिनिधी) : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांची शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण अभ्यास मंडळावर निवड झाली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ मधील तरतुदीनुसार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ही निवड केली आहे. निवडीबद्दल कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या चेअरमन रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष प्रसाद कामत, सचिव ॲड. व्ही. एन. पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

# रविवारपासून 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा

कोल्हापूर (प्रतिनिधी) : पुणे महाराष्ट्रीयन कलोपासक, संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि गायन समाज देवल क्लबच्या वतीने 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २२ ते २४ सप्टेंबर रोजी विद्यापीठातील भाषा भवनमधील सांस्कृतिक हॉलमध्ये ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन रविवार, दि. २२ रोजी सकाळी १० वाजता देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील, नाट्यशास्त्र विभागप्रमुख अंजली निगवेकर, काका निगोजकर यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती देवल क्लबचे कार्यवाह सचिन पुरोहित यांनी दिली.

# एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षेसाठी १३८० विद्यार्थी

**कोल्हापूर :** एम.फिल., पीएच.डी.साठी गुरुवारी घेण्यात आलेल्या ऑफलाईन प्रवेश परीक्षेस १३८० विद्यार्थी उपस्थित राहिले. २९६ विद्यार्थांनी दांडी मारली. परीक्षेची उपस्थितीची टक्केवारी ८२.३३ इतकी आहे.

शिवाजी विद्यीठाच्यावतीने विविध ४२ विषयांच्या एम. फिल., पीएच.डी. प्रवेशप्रक्रियेस बुधवार (दि.१८) पासून सुरुवात झाली आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, कन्या महाविद्यालय, सांगली; यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा या परीक्षा केंद्रांवर तीन सत्रात परीक्षा घेण्यात आली. प्रवेश परीक्षेचा दि. २० रोजी शेवटचा दिवस आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत देवचंद महाविद्यालय अजिंक्य

## शिवाजी विद्यापीठ विभागीय महिला; डी. आर. माने कॉलेज कागल उपविजेते

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयाच्या वतीने कुंभी-कासारी सहकारी कारखान्याच्या क्रीडांगणावर घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय महिला व्हॉलीबॉल स्पर्धेत देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर अजिंक्य ठरले, तर डी. आर. माने कॉलेज, कागल द्वितीय विजेते ठरले.

स्पर्धेत तृतीय क्रमांक व्यंकटेश कॉलेज इचलकरंजी, तर चौथा क्रमांक विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने मिळवला. या संघांची भिलवडी येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अंतिम सामन्यात सुरुवातीपासून देवचंद कॉलेजच्या संघाने माने कॉलेज संघावर आक्रमक चढाया केल्या. देवचंद कॉलेजने सरळ सेटने २ विरुद्ध ० अशा गुणफरकाने माने कॉलेज संघाचा पराभव केला. देवचंद कॉलेजने पहिला सेट २५-१२ तर दुसरा सेट २५-१७ अशा गुण फरकाने जिंकून एकतर्फी विजय मिळवला.

या स्पर्धेचे उद्घाटन कुंभी कासारी बँकेचे अध्यक्ष अजित नरके यांच्या हस्ते आणि सांगरूळ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यशवंत खाडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि संचालक मदन पाटील, सदाशिव खाडे, बी. आर. नाळे, प्राचार्य डॉ. डी.डी. कुरळपकर, विभागीय स्पर्धा सचिव प्रा. डी. एन. देसाई यांच्या उपस्थितीत करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक स्पर्धा सचिव प्रा. डॉ. अभिजित वर्णीरे यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रा. एस. पी. चौगले यांनी मानले. स्पर्धेचे बक्षीस वितरण विलास पाटील यांच्या हस्ते आणि मुख्याध्यापक दीपक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या स्पर्धेत १४ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेसाठी कुंभी-कासारी कारखान्याचे सहकार्य लाभले.



**कोपार्डे : येथील स. ब. खाडे महाविद्यालय येथे आयोजित केलेल्या विभागीय महिला व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना अजित नरके. सोबत यशवंत खाडे, मदन पाटील, बी. आर. नाळे, सदाशिव खाडे, प्राचार्य कुरळपकर, डॉ. वर्णीरे, प्रा. चौगले, प्रा. शिंदे, दीपक पाटील आदी उपस्थित होते.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2019
तरुण भारत

# विभागीय महिला व्हॉलिबॉल स्पर्धेत 'देवचंद' अजिंक्य



**कोपार्डे : शिवाजी विद्यापीठ विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना अजित नरके. सोबत यशवंत खाडे, मदन पाटील, बी. आर. नाळे, सदाशिव खाडे, प्राचार्य डॉ. कुरळपकर, डॉ. वणीरे, प्रा. चौगले, प्रा. देसाई प्रा. शिंदे, दीपक पाटील आदी.**

**वाकरे :** कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयातर्फे कुंभी-कासारी सहकारी कारखान्याच्या क्रीडांगणावर आयोजित शिवाजी विद्यापीठ विभागीय महिला व्हॉलिबॉल स्पर्धेत देवचंद महाविद्यालय (अर्जुननगर, निपाणी) अजिंक्य ठरले, तर डी. आर. माने कॉलेज (कागल) द्वितीय क्रमांक मिळविला. इचलकरंजीच्या व्यंकटेश कॉलेजने तृतीय तर कोल्हापुरच्या विवेकानंद कॉलेजने चौथा क्रमांक मिळवला. भिलवडी येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी या संघांची निवड झाली आहे.

अंतिम सामन्यात सुरुवातीपासून देवचंदच्या संघाने माने कॉलेजच्या संघावर आक्रमक चढाया करत सरळ सेटने २ विरुद्ध ० अशा गुण फरकाने पराभव केला. देवचंदने पहिला सेट २५-१२ तर दुसरा सेट २५-१७ अशा गुण फरकाने जिंकून एकतर्फी विजय मिळवला.

कुंभी-कासारी बँकेचे अध्यक्ष अजित नरके यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सांगरूळ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यशवंत खाडे होते. यावेळी संचालक मदन पाटील, सदाशिव खाडे, बी. आर. नाळे, प्राचार्य डॉ. डी. डी कुरळपकर, विभागीय स्पर्धा सचिव प्रा. डी. एन. देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक स्पर्धा सचिव प्रा. डॉ. अभिजित वणीरे यांनी केले. आभार प्रा. एस. पी. चौगले यांनी मानले. बक्षिस वितरण कारखान्याचे संचालक विलास पाटील यांच्या हस्ते व मुख्याध्यापक दीपक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. स्पर्धेत एकून १४ संघ सहभागी झाले होते. कुंभी कासारी कारखान्याचे स्पर्धेसाठी विशेष सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2019
तरुण भारत

# पर्यावरणासंदर्भात विद्यापीठात आज परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात भूगोल अधिविभागातर्फे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवार (दि. २०) सकाळी ११ वाजता प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. पर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकास हा या कार्यशाळेचा विषय आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाच्या भूगोल विभागप्रमुख डॉ. रवींद्र जायभाय उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त पर्यावरणप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन भुगोल विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले आहे.

**राष्ट्रीय परिषद :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागातर्फे पर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकास या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन. स्थळ :मानव्यशास्त्र सभागृहात. वेळ : सकाळी ११ वाजता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2019
तरुण भारत

# एमफिल, पीएचडी परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एमफिल, पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेशपरीक्षा सुरळीत पार पडली. विविध विषयांसाठी १६७६ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी १३८० विद्यार्थांनी परीक्षा दिली. २९६ विद्यार्थी गैरहजर होते. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर विविध विषयांसाठी ऑफलाईन पद्धतीने ही परीक्षा झाली. उर्वरित विषयांसाठी शनिवारपर्यंत परीक्षा सुरु राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 SEP 2019
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातही 'कास'.....



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरातील मैदानावर नुकतीच 'मिकी माऊस' नावाने ओळखली जाणारी फुले बहरली आहे.(ही फुले कास पठारावर आढळतात). या नेत्रसुखद पिवळया धम्मक फूलांना बहर आल्याने परिसरात मनोहारी दृश्य तयार झाले आहे. (छाया : शशिकांत मोरे)

लोकमत

# तर्कनिष्ठ चिकित्सा राजा ढाले यांच्या साहित्याचा महत्त्वाचा गुणविशेष

## अनिल सपकाळ : शिवाजी विद्यापीठ येथे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : तर्कनिष्ठ चिकित्सा हा राजा ढाले यांच्या साहित्याचा अत्यंत महत्त्वाचा गुणविशेष आहे. त्यांच्या साहित्याचे समकालीन संदर्भांच्या अनुषंगाने आकलन व अध्ययन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अनिल सपकाळ यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि मराठी अधिविभागातर्फे माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प गुंफताना 'राजा ढाले यांचे मराठी साहित्यातील योगदान' या विषयावर डॉ. सपकाळ बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी डॉ. अनिल सपकाळ यांचे व्याख्यान झाले. डावीकडून नंदकुमार मोरे, चंद्रकांत वाघमारे, श्रीकृष्ण महाजन, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.

### व्यापक स्वरूपाचे योगदान

डॉ. महाजन म्हणाले, 'ढाले यांनी मराठी साहित्यविश्वाला अत्यंत व्यापक स्वरुपाचे योगदान दिले. आंबेडकरवाद, बौद्ध तत्त्वज्ञानाचा पाया घेऊन त्यांनी मराठी साहित्याची अभिनव पद्धतीने मांडणी केली.'

डॉ. सपकाळ म्हणाले, 'उपेक्षित, वंचित अशा समाजव्यवस्थेतून पुढे येऊन सामाजिक न्यायासाठी वैचारिक, धार्मिक आणि साहित्यिक अशा विविध पातळ्यांवर राजा ढाले यांनी प्रस्थापितांविरोधात संघर्ष पुकारला. ढाले यांचे काव्य हे अंतर्बाह्य एकरूप आणि रूपनिष्ठ आहे. या कार्यक्रमास डॉ. जगन कराडे, पी. एस. कांबळे, विनय कांबळे, अमर कांबळे, युवराज देवाळे, आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

# कर्नाटकातील साहित्य चळवळीवर आंबेडकरांचा मोठा प्रभाव : डॉ. वाघमारे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना डॉ. चंद्रकांत वाघमारे. डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. अनिल सपकाळ व डॉ. रणधीर शिंदे आदी. (छाया : पप्पू आत्तार )

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कर्नाटकातील समग्र साहित्य चळवळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे, असे प्रतिपादन बेळगाव येथील राणी चन्नम्मा विद्यापीठाचे मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत वाघमारे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत 'मराठी व कन्नड साहित्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. वाघमारे म्हणाले, कन्नड साहित्य व साहित्यिक त्याला अपवाद नाहीत. कुवेंपू यांच्यापासून शिवराम कारंथ, गिरीश कर्नाड, गोपाळकृष्ण अडिग या साहित्यिकांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक जाणिवा, समताधिष्ठित समाजरचनेचा आग्रह या विचारांचा प्रभाव पडला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन म्हणाले, साहित्यिकांमध्ये, विचारवंतांमध्ये मतभेद असले तरी त्यांच्यात कायमस्वरूपी फूट पडणे समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने घातक ठरते. त्यामुळे विचारवंतांनी व्यापक समाजहिताची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने एकत्र येण्याची गरज आहे. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

# कर्नाटकातील साहित्य चळवळीवर आंबेडकर विचारांचा प्रभाव

## – डॉ. चंद्रकांत वाघमारे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कर्नाटकातील समग्र साहित्य चळवळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचंड मोठा प्रभाव आहे, असे प्रतिपादन बेळगाव येथील राणी चन्नम्मा विद्यापीठाचे मराठी अधिविभागप्रमुख डॉ. चंद्रकांत वाघमारे यांनी येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना डॉ. चंद्रकांत वाघमारे. सोबत डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. अनिल सपकाळ व डॉ. रणधीर शिंदे.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेतील चौथे पुष्प गुंफताना 'मराठी व कन्नड साहित्यावरील डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. वाघमारे म्हणाले, या देशातील एकही राज्य असे नाही की, जेथील बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव पडला नाही. कन्नड साहित्य आणि साहित्यिकसुद्धा त्याला अपवाद नाहीत. या विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यकृतींमधून पाहावयास मिळते. दलित बंडाय चळवळीमध्ये फूट पडून दलित आणि बंडाय असे दोन स्वतंत्र प्रवाह असले तरी त्यांच्यावरील बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव कायम आहे. दलित साहित्य चळवळीवर हा प्रभाव अधिक प्रकर्षाने जाणवतो, तर बंडाय साहित्य चळवळीवर त्या बरोबरीने बसवण्णा, मार्क्सवाद, लोहियावाद, पेरियार आदी विचारांचाही पगडा जाणवतो.

अध्यक्षीय भाषणात डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, साहित्यिकांमध्ये, विचारवंतांमध्ये मतभेद असले तरी त्यांच्यात कायमस्वरूपी फूट पडणे समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने घातक ठरते. त्यामुळे परंपरागत सनातन व्यवस्थेविरुद्ध पुरोगामी साहित्यिक विचारवंत यांनी व्यापक समाजहिताची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने एकत्र येण्याची मोठी गरज आहे. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल डॉ. जयदीप बागी यांचा गौरव करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.

# गुणवत्ता शिष्यवृत्तीत तंत्रज्ञान अधिविभागाची 'हॅट्‌ट्रिक'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये शहरी अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला. 'डीओटी'ने सलग तीन वर्षे यश मिळवित 'हॅट्‌ट्रिक' साधली आहे.

विद्यापीठांतर्गत विविध संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व अधिविभागात उच्च शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात येते. तंत्रज्ञान अधिविभागाने २०१६ ते २०१९ तीन वर्ष प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

नुकताच शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ विद्यापीठात झाला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांना गौरविण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे आदी उपस्थित

# भू-पर्यावरणीय समस्या, शाश्वत विकासाबाबत आज राष्ट्रीय परिषद

## आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र अधिविभागातर्फे 'भू-पर्यावरणीय समस्या व शाश्वत विकास' विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद व आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.




विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात शुक्रवारी (दि. २०) सकाळी ११ वाजता प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन होईल. पुणे विद्यापीठाच्या भूगोलशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. रवींद्र जायभाय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. भू-पर्यावरणीय समस्या व शाश्वत विकास याबाबत परिषदेत मंथन होणार आहे.

जैवविविधता, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, जोखीम मूल्यांकन आणि व्यवस्थापन, हवामान बदल, ग्रामीण विकास, शाश्वत विकास, नैसर्गिक साधन संपत्ती व लोकसंख्या वाढ, सुदूर संवेदन व भौगोलिक माहिती प्रणाली आदी विषयांवरील ७० शोधनिबंधाचे सादरीकरण होणार आहे. हिमाचल प्रदेश, गुजरात, कर्नाटक, गोवा आदी राज्यांतील साधन व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. संभाजी शिंदे व आजी-माजी विद्यार्थी मेळाव्याच्या समन्वयक डॉ. मीना पोतदार यांनी केले आहे.

लोकमत

## मानसशास्त्र अधिविभागाचा पुढाकार : कोल्हापूरसह सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांचे समुपदेशन करणार

# पूरग्रस्तांचे मनोधैर्य वाढविण्याचा विद्यापीठाचा 'मानस'

प्रदीप शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नैसर्गिक आपत्तीमध्ये आयुष्यभराची कमाई पाण्यात वाहून गेल्याने मानसिकदृष्ट्या खचलेल्या पूरग्रस्तांचे मनोधैर्य वाढविण्याचा 'मानस' शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आला आहे. मानसशास्त्र अधिविभागाच्या पुढाकाराने कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांतील विविध कॉलेजमध्ये शिकणारे 'मानसशास्त्र'चे एम.ए. भाग दोनचे विद्यार्थी पूरग्रस्तांचे समुपदेशन करणार आहेत.



शिवाजी विद्यापीठातील मानसशास्त्र अधिविभागात आयोजित करण्यात आलेल्या 'पूरग्रस्तांचे समुपदेशन' कार्यशाळेत कोल्हापूरसह सांगलीतील 'मानसशास्त्र'चे विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठात मानसशास्त्र अधिविभागाच्या वतीने नुकतीच 'पूरगस्तांचे समुपदेशन' कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये कोल्हापुरातील महावीर, राजाराम महाविद्यालय, सांगलीतील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, केबीपी कॉलेज (इस्लामपूर), एसजीएम कॉलेजचे (कऱ्हाड) मानसशास्त्र विषयाचे विद्यार्थी सामील झाले होते. या विद्यार्थ्यांचा गट पूरबाधित गावांत जाऊन संवाद साधणार असून, पूरग्रस्तांच्या मानसिकतेचे आकलन करणार आहेत. यानंतर हे विद्यार्थी संबंधितांचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न करणार आहेत. यासाठी 'आरईबीटी' या थेरपीचा वापर करणार आहेत. हा उपक्रम दर शनिवारी व रविवारी राबविला जाणार आहे. यामध्ये १०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मानसशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. भारती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिविभागातील प्रा. डॉ. अश्विनी पाटील, प्रा. अमोल कांबळेंसह डॉ. भरत नाईक (महावीर कॉलेज), डॉ. विकास मिणचेकर (केडब्लूसी), डॉ. घन:शाम कांबळे (एबीपी कॉलेज), प्रा. स्वाती मोरकर (एसजीएम), प्रा. विजय मुतनाळे (राजाराम कॉलेज) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

### 'आरईबीटी' थेरपीच्या आधारे समुपदेशन

विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'पूरग्रस्तांचे समुपदेशन' कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेले 'मानसशास्त्र'चे विद्यार्थी हे पूरबाधित गावात जाऊन शाळेतील मुले, तरुण-तरुणी, महिला, ज्येष्ठ नागरिक, आदींशी संवाद साधणार आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणार आहेत. यावेळी त्यांच्यावरील ताण-तणावांचेही आकलन करुन 'आरईबीटी' थेरपीच्या आधारे समुपदेश करणार आहेत.

### पूरग्रस्तांमधील लक्षणे

भीती, निद्रानाश, झोप नीट न लागणे, छातीमध्ये धडधड वाढणे, उदासीनता ही लक्षणे प्रामुख्याने पूरग्रस्तांमध्ये दिसतात. मात्र, याकडे दुर्लक्ष केल्यामुळे मानसिक खच्चीकरण होण्याची शक्यता असते.



ज्या ठिकाणी संसार उभारला, त्या ठिकाणी चिखलगाळ पाहून अनेकजण हताश झाले आहेत. याचा मोठ्या प्रमाणात पूरग्रस्तांना मानसिक धक्का बसलेला असू शकतो. याचा शोध घेऊन त्यांना मानसिक आधार देण्याचा प्रयत्न करणार आहे.

– प्रा. डॉ. भारती पाटील,
मानसशास्त्र अधिविभागप्रमुख

# सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांवर प्रकाशझोत

## विद्यापीठ युवा महोत्सवात सांस्कृतिक चळवळीला बळ

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

येथे डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात सहभागी कलाकारांनी विविध विषय मांडून सामाजिक जाणिवा स्पष्ट केल्या. रात्री उशिरापर्यंत महोत्सवाचा जागर सुरू होता. उत्साहात युवा महोत्सव पार पडला. जिल्ह्यातील ५६ महाविद्यालयांतील एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी महोत्सवात सहभागी होऊन आपली कला सादर केली. ज्वलंत प्रश्नांसह सामाजिक, नैसर्गिक, पर्यावरणपूरक विषयांना विद्यार्थ्यांनी वाचा फोडली.

लोकसंगीत, लोककला, लावणी, लघुनाटिका, पथनाट्य, एकांकिका, नकला, मूकनाट्य, वक्तृत्व, सुगम गायन, भारतीय समूहगीत, वादविवाद या कलाप्रकारात विद्यार्थ्यांनी धमाल उडवून दिली. कलाकारांना टाळ्या आणि शिट्ट्यांनी उत्स्फूर्त दाद मिळाली. सादर झालेल्या नृत्यांवर प्रेक्षकांनी ठेका धरला. लोकनृत्य, लोककला पाहण्यासाठी प्रेक्षकांनी तुडुंब गर्दी केली होती.

सकाळपासून महाविद्यालयाचा परिसर युवा महोत्सवामुळे भारून गेला होता. विविधांगी रंगभूषा, वेशभूषेतील युवा विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकारांमुळे महाविद्यालय परिसराला कलेचे रूप आले होते. रात्री उशिरापर्यंत जोशपूर्ण वातावरणात सहभागी विद्यार्थ्यांनी आपला कलाविष्कार सादर केला. या महोत्सवामुळे सांस्कृतिक चळवळीला चालना मिळाली. कलेची झालेली उधळण डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली. लावणी, जोगवा, मंगळागौरीच्या गीतावरील नृत्यांना उपस्थित प्रेक्षकांकडून वाहवा मिळाली. 'मला जायचंय ग बया सौंदत्तीला' व 'बारा घरच्या बारा ग जणी जागर करतोया' हे मंगळागौरी गीत लक्ष्यवेधी ठरले. या सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच युवा महोत्सवात काश्मीर आणि रद्द केलेले ३७० कलम, महागाई, दुसरं प्रेम, बँडेड वस्तूंचा वापर, फॅशन एक विकृती, आरक्षण, आजची शिक्षण पद्धती, हरवत चाललेला संवाद व संपुष्टात आलेला नात्यातील व समाजमनातील संवाद आदी विषयांवर पथनाट्यातून कलाकारांनी प्रकाशझोत टाकला.



**जयसिंगपूर : मंगळागौर सादर करताना सहभागी कलाकार.**

### महापूर, जलव्यवस्थापनासाठी भरीव मदतीची गरज

गेल्या महिन्यात शिरोळ तालुक्याला महापुराने तडाखा दिला. या ज्वलंत प्रश्नावर वक्तृत्व स्पर्धेत प्रकाश टाकण्यात आला. जलव्यवस्थापन आणि शासनाची तुटपुंजी मदत संसाराला पुरत नाही, हा मुद्दा मांडताना जलव्यवस्थापनाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले.

20 SEP 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणाईच्या कलाविष्कारांनी रंगला युवामहोत्सव

## मगदूम महाविद्यालयात लोककलांच्या सादरीकरणाला प्रतिसाद; २६-२८ दरम्यान मध्यवर्ती युवामहोत्सव

प्रतिनिधी
जयसिंगपूर

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचा जिल्हास्तरीय ३९ वा युवामहोत्सव डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयात मोठ्या उत्साह, जल्लोषात पार पडला. महाविद्यालयीन तरुणाईच्या कलागुणांनी सारा परिसर उल्हासित झाला होता. विविध विभागातील स्पर्धकांनी आपली कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लोककलांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. युवामहोत्सावात एकूण ५६ महाविद्यालयातील १२०० स्पर्धकांनी सहभाग घेतला. दिवसभर चाललेल्या युवामहोत्सवात सादर करण्यात आलेल्या लोककलांना उपस्थितांकडून चांगलीच दाद मिळाली. मुधोजी महाविद्यालय फलटण (जि. सातारा) येथे २६ ते २८ रोजी होणाऱ्या मध्यवर्ती युवामहोत्सवासाठी निवड करण्यात आलेले अनुक्रमे संघ असे.

लोककला – दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज (इचलकरंजी), महावीर महाविद्यालय (कोल्हापूर), दि न्यू कॉलेज (कोल्हापूर),

लोकनृत्य – आजरा महाविद्यालय (आजरा), श्री शिव शाहू महाविद्यालय (सरुड), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), मूकनाट्य – विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), दूध साखर महाविद्यालय (बिद्री), लघुनाटीका – विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर),

वक्तृत्व–मराठी – दि न्यू कॉलेज, (कोल्हापूर), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर), श्री व्यंकटेष महाविद्यालय (इचलकरंजी), वक्तृत्व–हिंदी डी. आर. माने महाविद्यालय (कागल), सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), महावीर महाविद्यालय (कोल्हापूर), वक्तृत्व–इंग्रजी सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), डॉ. घाळी कॉलेज (गडहिंग्लज), देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर),

वादविवाद – दूध साखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), डी. डी. शिंदे कॉलेज (कोल्हापूर), सुगमगायन –विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), श्री शिव शाहू महाविद्यालय (सरुड), व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी), लोकवाद्यवृंद – विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), डी. आर. माने महाविद्यालय (कागल), रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज (कोल्हापूर), समूहगीत– विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर), दि न्यू कॉलेज, (कोल्हापूर).



जयसिंगपूर : ३९ व्या युवामहोत्सवात लोककला सादर करताना महाविद्यालयीन विद्यार्थी.

### पथनाट्य, एकांकिका विजेते कॉलेज

दूध साखर महाविद्यालय (बिद्री), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), शरद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (यड्राव), एकांकिका – भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), शरद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (यड्राव), नकला –राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर), आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज (कोवाड), सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर).